महाराष्ट्र शासन
पोलीस अधीक्षक कार्यालय, वाशिम.
काटा रोड, सिव्हील लाईन, वाशिम ता.जि. वाशिम.
कार्यालय दुरध्वनी क्र. ०७२५२-२३४८३४
ई-मेल sp.washim@mahapolice.gov.in
संकेतस्थळ -www.washimpolice.gov.in

क्र- पोअवा/पशा-३/२१ ऑक्टोबर/पोलीस स्मृती दिन/ 8438 /२०२३ वाशिम दिनांक 18 OCT 2023

## आदेश

दिनांक २१ ऑक्टोबर २०२३ हा दिवस पोलीस स्मृतीदिन म्हणून पाळण्याकरिता पोलीस महासंचालक महाराष्ट्र राज्य मुंबई यांनी आदेश निर्गमित केलेले आहेत. सदर कार्यक्रमाकरिता सर्व पोलीस अधिकारी/कर्मचारी यांनी प्रथम गणवेषात व कार्यलयीन कर्मचारी यांनी राष्ट्रीय पोशाखात सकाळी ०७:०० वाजता अगत्याने, नविन पोलीस मुख्यालयाच्या प्रांगणात उपस्थितीत राहावे. कार्यक्रमाचे आयोजन व्यवस्थितरित्या पार पाडता यावे म्हणून खालील नमुद अधिकाऱ्याकडे त्यांचे नावासमोर दर्शविल्याप्रमाणे जबाबदारी सोपविण्यात येत आहे.

**१) पोलीस निरीक्षक जिल्हा विशेष शाखा वाशिम :-**

पोलीस स्मृती दिनाच्या १०० निमंत्रण पत्रिका तयार करून वाशिम जिल्हयातील आजी माजी खासदार व आमदार,गणमान्य व्यक्ती, सेवानिवृत्त पोलीस अधिकारी/कर्मचारी, माजी सैनिक व स्वातंत्र्य सैनिक यांना सन्मानपूर्वक निमंत्रण देवनू कार्यक्रमास अगत्याचे उपस्थित राहण्याबाबत विनंती करावी.

**२) राखीव पोलीस निरीक्षक पोलीस मुख्यालय वाशिम :-**

अ) यांनी ध्वजस्तंभाचे दोन्ही बाजुस दोन शासकीय शामियाने लावावेत. एक शामियाना निमंत्रीत पाहूण्यासाठी व दुसरा गणमान्य व्यक्ती, पोलीस अधिकारी/कर्मचारी यांचेकरिता असल्याबाबत बोर्ड तयार करून लावावे तसेच बसण्याकरिता खुर्च्यांची व्यवस्था करावी.

ब) नविन पोलीस मुख्यालय परिसर सर्वतोपरी साफ-सफाई करावी.

क) परेडचा सराव दिनांक १८.१०.२०२३ ते १९.१०.२०२३ या दिवशी घेण्यात यावा व रंगीत तालीम दिनांक २०.१०.२०२३ रोजी घेण्याबाबत कार्यवाही करावी.

ड) पुष्पचक्र तयार करून घ्यावे व गुलाबांच्या पाकळयांनी सजावट करून घ्यावी.

इ) तीन पोडीयम (लेक्चर स्टँड) व सोफा व आवश्यक ईत्यादी साहित्य उपलब्ध करून ठेवावे.

ई) स्मृती दिनांकरिता १ बिगुलर व १ लाईट ड्रम वादक कर्मचारी हजर ठेवावे.

**३) श्रीमती.स्वाती मधुकर इथापे (पोलीस उपनिरीक्षक नेम.अनैत्तिक मानवी वाहतुक शाखा वाशिम ) व श्रीमती मनिषा तायडे (सहा.पो.नि. नेम.डायल ११२ शाखा वाशिम ) :-**

देशासाठी बलीदान दिलेल्या पोलीस अधिकारी/कर्मचारी यांच्या यादीतील एकुण १८८ नावाचे वाचन आळीपाळीने करतील.

**४) श्री. शब्बीरखान मुनीरखान पठाण (पोलीस उपनिरीक्षक नेम.स्थागुशा वाशिम )**

यांना यादीतील बलीदान दिलेल्या नावांचे वाचन करिता राखीव म्हणून ठेवण्यात येत आहे.

**५ )पोलीस निरीक्षक कल्याण शाखा :-**

पोलीस स्मृती दिन कार्यक्रमासाठी फोटोग्राफर तसेच व्हीडीओ ग्राफर यांची व्यवस्था करतील.

**६)पोलीस निरीक्षक पोलीस स्टेशन वशिम :-शहर**

Scanned with OKEN Scanner

पोलीस स्मृतीदिन २०२३ कार्यक्रम बंदोबस्ताची सर्वतोपरी जबाबदारी पार पाडतील.

**७) पोलीस निरीक्षक, बिनतारी संदेश विभाग वाशिम :-**

कार्यक्रमाच्या ठिकाणी प्रकाश व्यवस्था, लाऊड स्पीकर ईतर आवश्यक सामुग्री लावण्याबाबत कार्यवाही करतील व मेरे वतन के लोगो हे देशभक्तीपर गीत वाजवतील.

शहीद परेडचे आयोजन करिता प्लाटून कमांडर म्हूणन राखीव पोलीस उपनिरीक्षक पोलीस मुख्यालय वाशिम यांना नेमण्यात येत आहे. सर्व अधिकारी पोलीस स्मृतीदिन समारंभ संबधाने नेमून दिलेल्यानूसार कार्यवाही करतील व कार्यक्रम योग्य प्रकारे पार पाडण्यासाठी सहकार्य करतील. सदर शहीद झालेल्या पोलीस अधिकारी/पोलीस जवानांच्या (सर्व दर्जाचे) नावाची यादी ही www.mahapolice या वेबसाईटवर उपलब्ध आहे.

**सहपत्र :-** शहीद झालेल्या पोलीस अधिकारी/जवानांच्या
नावाची यादी (सर्व दर्जाचे)

**( बच्चन सिंह भा.पो.से.)**
पोलीस अधिक्षक, वाशिम

**प्रति,**

पोलीस उपअधिक्षक (गृह), पोलीस अधिक्षक, कार्यालय वाशिम (यादिसह)
राखीव पोलीस निरीक्षक, पोलीस मुख्यालय वाशिम. (यादिसह)

**प्रत -** अपर पोलीस अधिक्षक, वाशिम
उपविभागीय पोलीस अधिकारी, वाशिम/कांरजा/मंगरुळपीर
सर्व टाणेदार वाशिम जिल्हा.
पोलीस निरीक्षक, स्थानिक गुन्हे शाखा (यादिसह)/जिल्हा विशेष शाखा (यादिसह)/पो.नि. शहर वाहतुक शाखा/आर्थिक गुन्हे शाखा/पो.नि.पो.स्टे.वाशिम /पो.नि.कल्याण शाखा/ पो.नि.बिनतारी संदेश विभाग /पोलीस नियंत्रण कक्ष/तंटामुक्त गांव मोहिम शाखा/पो.अ.यांचे वाचक शाखा/अ.पो.अ.यांचे वाचक शाखा/कार्यालय अधिक्षक (सर्व लिपिक वर्गीय कर्मचारी यांना उपस्थित राहण्याबाबत कळवावे)/लघुलेखक सहा.लेखा.अधिकारी पो.अ.कार्यालय वाशिम /महामार्ग अमानी/संगणक कक्ष विभाग/सायबर विभाग/ रा.गु.अ.वि.वशिम/महिला तक्रार निवारण कक्ष/अे.सी.बी.वाशिम/ना.ह.स.विभाग/बि.डी.डी.एस./मोटार परिवहन विभाग/प्रबंधक लिपीक / पो.क.नि.लिपीक /पो.अ.कार्या, वाशिम यांना माहीतीस व उचित कार्यवाहीस.
कार्यक्रमास उपस्थित राहतील.

---***---

Scanned with OKEN Scanner